# धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

## पुनरूत्थान काळातील तिसरा रविवार

## १८ एप्रिल २०२१

## श्रद्धावंतांच्या प्रार्थना

धर्मगुरू ः माझ्या बंधुभगिनींनो, ख्रिस्ताच्या पुनरूत्थानाच्या आनंदासह आपण आपल्या परमेश्वर पित्याकडे प्रार्थना करू या. त्याच्या अति प्रिय पुत्राच्या प्रार्थना त्याने ऐकल्या आणि स्वीकारल्या, तो आपल्या मागण्या पूर्ण करील असा विश्वास बाळगू या.

प्रतिसाद ः **प्रभो, आमची प्रार्थना ऐक.**

१. आपले पोप फान्सिस, आर्चबिशप फेलिक्स, धर्मगुरू व व्रतस्थ ह्यांना परमेश्वराच्या दयेचा, प्रेमाचा व कृपेचा स्पर्श व्हावा म्हणून आपण प्रार्थना करू या.

२. कोरोणा विषाणु दिवसेनदिवस जास्त प्रभावी होत आहे. रोग्यांची काळजी घेण्यासाठी हॉस्पिटलमध्ये जागा नाही. आपल्या राज्यकर्त्यांनी व आरोग्य अधिका-यांनी ह्या गंभीर परिस्थितीवर मात करण्यासाठी योग्य ते निर्णय घ्यावेत म्हणून आपण प्रार्थना करू या.

३. ख्रिस्ताच्या पुनरूत्थानाद्वारे आपल्याला नव जीवनाचा मार्ग दिसावा, आपल्या शब्द व कृतीद्वारे ख्रिस्त प्रतिविंबीत व्हावा व आपल्या कुटुंबाला सौख्य, शांती व आंनद लाभावा म्हणून आपण प्रार्थना करू या.

४. आपल्या धर्मग्रामात जे आजारी, वृद्ध व दुःखीकष्टी आहेत त्यांना पुनरूत्थित ख्रिस्ताच्या प्रेमाचा व कृपेचा स्पर्श व्हावा म्हणून आपण आपण प्रार्थना करू या.

५. आपल्या गावपरिवारातील सर्व लहान बालकांवर चांगले संस्कार केले जावेत, तरूणांना जीवनात योग्य दिशा मिळावी व उचित निर्णय घेण्याची त्यांची क्षमता वाढावी, वयोवृद्धांची व्यवस्थीत काळजी घेतली जावी, स्त्रियांना सन्मानाने वागविले जावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

थोडावेळ शांत राहून आपण आपल्या वैयक्तिक हेतूंसाठी प्रार्थना करू या.

धर्मगुरू ः हे स्वर्गीय पित्या, तुझ्या लोकांच्या जीवनातील अनेक गरजांची तुला जाणीव आहे. तुझ्यावर विश्वास ठेवणा-या सर्वांच्या प्रार्थना ऐक आणि त्यांचा स्वीकार कर. ही प्रार्थना आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.